पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३१२७ दि. २८ /०९ /२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

## नातवानेच केला आजीचा खून

दिनांक २६/०९/२०१९ रोजीरात्रौ २२:३० वा.चे सुमारास सनशाईनकोर्ट सोसायटी, कल्याणीनगर, पुणे येथील इमारत क्र. ५ बी मधील ५ व्या मजल्यावरील फ्लॅट नं. १६ मध्ये एका महिलेचे प्रेत असून दुर्गंधी येत असल्याची खबर पोलीसांना मिळाली असता पोलीसांनी सदर बाबत तात्काळ घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली असता, सदर महिलेचे नाव- चांदणी मनदिपसिंग चौहान, वय ६७ वर्षे, असे असल्याचे समजले असून सदर फ्लॅटच्या दरवाजाचा कोयंडा व लॅचलॉक उचकटलेले दिसून आले. तसेच घरातील साहित्य व चिज वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या दिसत असल्याने प्रथमदर्शनी घरफोडी मधील घटना असल्याचे जाणवत होते. सदरची घटना प्रथम पाहणारे इसम वय ४३ वर्षे, रा. शिवाजीनगर, पुणे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून येरवडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ६८०/२०१९ भा.दं.वि.क. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास श्री. युनूस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पोलीस स्टेशन, पुणे यांचेकडे देण्यात आला.

श्री.प्रसाद अक्कानवरु, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, पुणे, श्री. रामचंद्र देसाई, सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग, डॉ.श्री.शिवाजी पवार, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे यांचे मार्गदर्शना खाली युनूस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे., अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), येरवडा पो.स्टे. यांनी सोसायटीतील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी करून तसेच सोसायटीतील वॉचमन यांचेकडे कसून तपास केला असता,एक संशयित इसम दिनांक १९/०९/२०१९ रोजी व दिनांक २१/०९/२०१९ रोजी सोसायटीतील नमूद फ्लॅटकडे जाताना, येताना दिसत असून दि.२१/०९/२०१९ रोजी त्याचे हातात लाकडी दांड्याचा टिकाव दिसून येत असून तो गुन्ह्याचे घटनास्थळावर मिळून आल्याने, त्याचे बाबत अधिकतपास केला असता फुटेज मधील व वॉचमन यांनी सांगितलेल्या माहितीतील संशयित इसम हा हिमाचल प्रदेश येथील असल्याचे निष्पन्न झाले असून त्याचे मोबाईल फोन बंद मिळून येत होते. त्याचे लोकेशन त्याचे मुळगावी मिळून आल्याने लागलीच पोलीस पथक हिमाचल प्रदेश येथे रवाना करण्यात आले. सदर पथकाकडून माहिती मिळाली की, ओशम संजय गौतम याचे विरूध्द बी.एस.एल.कॉलनी पोलीस स्टेशन, सुंदरनगर, हिमाचल प्रदेश येथ `दिनांक ३१/०८/२०१९ रोजी गुन्हा रजि.नं. ९८/२०१९ भा.दं.वि.क. ३४२,३७९,३८० प्रमाणे गुन्हा दाखल असून त्या गुन्ह्यात त्याला दि.२६/०९/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे व तो दि. ३०/०९/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मध्ये आहे. त्या प्रमाणे त्यास वर्ग करून दाखल गुन्ह्यात अटक करण्याची तजविज ठेवली असून, आरोपी- ओशम संजय गौतम हा यातील मयत महिला चौहान यांचा नातू (मुलीचा मुलगा) असल्याचे निष्पन्न झाले असून, त्याने त्याच्या आजीचा खून नक्की कोणत्या कारणावरून केला आहे याबाबत त्याच्या अटके नंतर माहिती स्पष्ट होईल.